ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# आदिवासी विधार्थ्यांना बोलीभाषेमुळे शिक्षणात येणा—या समस्यांचा अभ्यास

**सौ. अनिता कुमार धायगुडे**

अ‍सिस्टंट प्रोफेसर अध्यापक महाविद्यालय, वडगाव मावळ

**Abstract**

*प्रत्येक भाषेला स्वत:ची अशी ओळख आणि संस्कृती असते. भाषा हे विचार व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे.या माध्यमामुळे दोन व्यक्तिना किंवा अन्य व्यक्तिंना इच्छेनुसार व्यक्त होणारे साधन आहे. काही तत्वज्ञानाच्या मते संस्कारातुन शिकून संपादन करावयाची गोष्ट म्हणजे भाषा. प्रत्येकाचे संस्कार हे वेगवेगळे असतात. असे म्हटले जाते कि दर १२ मैलावरती भाषा बदलते. एकाच प्रदेशात रहात असलो तरी ही प्रत्येकाची भाषा थोडी तरी वेगळी असते. बोलण्याचा वेग, उच्चार, लकब हया बदलत असतात.त्यामुळेच महाराष्ट्रात मराठी जरी बोलत असले तरी प्रत्येक भागाची बोली भाषा वेगवेगळी आहे. व—हाडी लोक व—हाडी भाषेत तर आदिवासी लोक त्यांच्या बोली भाषेत बोलतात. प्रत्येकाची बोली भाषा वेगळी असल्याने प्रत्येक मुल आपल्या आजूबाजूला जसे संस्कार होतील जशी भाषा बोलली जाईल त्याच भाषेत बोलायला सुरवात करतात तिच त्यांची बोली भाषा असते. आपल्या बोली भाषेत बालकाला जास्त चांगल्या प्रकारे आकलन होते. महात्मा गांधीजीनी मातृभाषेचे महत्व व मातृभाषेतून शिक्षण हयाचे महत्व स्पष्ट केले आहे. प्रत्येक बालकाला सुरवातीचे शिक्षण हे मातृभाषेतून दिले तर त्याच्या मुलभूत संकल्पना व त्याचे आकलन होण्यास मदत होते. हेच तत्व लक्षात घेवून आदिवासी बालकांना शिक्षण घेत असताना भाषेमुळे नेमक्या कोणत्या अडचणी येतात हे समजावून घेणे महत्वाचे आहे. पाठयपुस्तकामध्ये जी भाषा वापरली जाते ती प्रमाण भाषा आहे. ही प्रमाणीत भाषा समजावून घेण्यासाठी त्यांना काय अडचणी येतात त्या समजावून घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्तावना :**

आदिवासी लोक हे डोंगर द—या, दुर्गम भागात, रहात असतात. हया भागामध्ये आदिवासींना स्वत:ची अशी वेगवळी संस्कृती आहे. स्वत:ची ही संस्कृती आदिवासी समाज जपत असतो. आज स्वातंजयानंतर एवढया वर्षानंतरही आदिवासी मुलभूत

गोष्टींपासून वंचित आहेत. त्याच सर्वात मोठ जे कारण आहे ते हे कि आदिवासीं लोक शिक्षणापासून वंचित आहेत. त्यांच्या पर्यत शिक्षण पोहोचलेले नाही. शिक्षण हक्क कायदा २००९ साली लागू झाला. त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे हे येणारा काळ सांगणार आहे. परंतु आज तरी आदिवासींची परिस्थिती बदललेली नाही. त्याचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी हया विषयाची निवड केली.

**संशोधनाची गरज व महत्व** : संपूर्ण देशाचा विकास करण्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्तिचा विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरे माध्यम नाही. प्रत्येकाला शिक्षणाचा समान हक्क आहे. ६ ते १४ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाचा समान हक्क आहे. यासाठी शिक्षण हक्क कायद्याची २००९ पासून अंमलबजावणी सुरू झाली. त्याआधी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम चालू होते. पण सर्वाना एकसमान लेखून हे शिक्षण प्रसाराचे काम देशपातळीवरती चालू आहे. देशभरातील सर्व बालकांना एकाच मापाने तोलने तसे चुकीचे आहे. कारण प्रत्येक समाजाच्या चालीरिती , रूढी, परंपरा, तेथील भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे. या परिस्थितीचा त्यांच्या बोलीभाषेवर परिणाम होत असतो. शिक्षणाचा विचार करत असताना भाषेचा विचार करणे गरजेचे आहे.

प्रत्येक समाजाचा विकास होण्यासाठी भाषा हे एक माध्यम आहे. स्वतःच्या भाषेत आकलन सर्वात चांगले होते. प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया आहे. तर प्राथमिक शिक्षण हे जर मातृभाषेतून दिले तर त्यांचे आकलन खूप व्यवस्थित होईल. त्यासाठी प्रत्येकाला मातृभाषेतून शिक्षण दिले तर आदिवासी समाज शिक्षण घेईल. त्यांच्या विकासासाठी शिक्षण खूप महत्वाचे आहे.

**शीर्षक** : आदिवासी विधार्थ्यांना बोलीभाषेमुळे शिक्षणात येणा—या समस्यांचा अभ्यास

**शीर्षकाचे स्पष्टीकरण** : शाळेमध्ये जेव्हा मुल शिक्षण घेत असतात तेव्हा त्यांना शाळेतील प्रमाण भाषेमध्ये शिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे आदिवासी भागातून येणा—या मुलांना या भाषेमुळे नेमक्या कोणत्या समस्या येतात हे जाणून घेण्यासाठी हया विषयाची निवड केली.

**कार्यात्मक व्याख्या :**

१) **आदिवासी** : डोंगर द—यात व दुर्गम भागात रहाणारे व समान बोलीभाषा असणारे व एकाच भू—प्रदेशात रहाणारे लोक.

२) **भाषा** : विचारांची देवाण—घेवाण करण्याचे माध्यम जी त्यांची दैनंदिन जीवनाची बोली भाषा आहे.

३)**अडचणी** : शिक्षण घेत असताना येणा—या समस्या.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. आदिवासींना शिक्षण घेताना भाषेमुळे येणा—या समस्यांचा शोध घेणे.

२. आदिवासींना भाषेमुळे शिक्षणात येणा—या समस्येचे वर्गीकरण करणे.

३. आदिवासींना भाषेमुळे शिक्षणात येणा—या समस्येवर उपाय शोधणे.

**संशोधनाची व्याप्ती :** प्रस्तुत संशोधन हे मावळ तालुक्यातील इ.९वी मध्ये शिकणा—या ठाकर समाजातील विद्यार्थ्यासाठी आहे. प्रस्तुत संशोधन हे फक्त ठाकर विधार्थ्याच्या बोली व प्रमाणीत भाषेशी संबंधित आहे.

**संशोधनाची मर्यादा व परिमर्यादा —**

१. प्रस्तुत संशोधन हे ठाकर जमातीतील इ.९वी मध्ये शिकणा—या विधार्थ्यापुरते मर्यादित आहे.

२.प्रस्तुत संशोधन हे लोनावळा शहरातील गुरूकुल हायस्कूल मध्ये शिकणा—या २० ठाकर विधार्थ्यापुरते मर्यादित आहे.

३.प्रस्तुत संशोधन हे ठाकर जमातीतील विधार्थ्याच्या भाषीक समस्येपुरते मर्यादित आहे.

**जनसंख्या** — मावळ तालुक्यातील इ. ९वीचे विधार्थी ही सदर संशोधनाची जनसंख्या आहे. तसेच मावळ तालुक्यातील ठाकर जमातीचे विधार्थी ही सदर संशोधनाची जनसंख्या आहे.

**नमुना निवड** — सदर संशोधनासाठी गुरूकुल हायस्कूल मधील इ.९वीत शिकणारे २० ठाकर विधार्थी यांची निवड सहेतुक नमुना निवड पध्दतीने केली आहे.

**संशोधन पध्दती** – प्रस्तुत संशोधन हे सद्यस्थितीतीन समस्येशी निगडीत असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला आहे.

**माहिती संकलनाची साधने** : प्रस्तुत यंशोधनासाठी संशोधक निर्मित मिश्र प्रश्नावलींचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती विश्लेषणाची साधने :** प्रस्तुत संशोधनामध्ये प्रतिसादकांकडून आलेल्या प्रतिसादाचे वा संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी गुणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन कार्यपध्दती** : सर्वात प्रथम ठाकर वस्तीवरील विधार्थी कोणत्या शाळेत जातात हे शोधून त्या शाळेतील मुख्याध्यापकांशी चर्चा केली. त्यानंतर भाषेच्या शिक्षकांशी सविस्तर चर्चा केली.त्यांनंतर प्रशावली तयार केल्या. त्या प्रश्नावल्या ठाकर जमातीतील एका शिक्षकाकडून तपासून घेतल्या. मुख्याध्यापकांचा परवानगी घेवून प्रश्नावल्या विधार्थ्याकिडून भरून घेतल्या. आलेल्या प्रतिसादानुसार माहितीचे विश्लेषण केले.

**अर्थनिर्वचन :** विधार्थ्याकिडून भरून घेतलेल्या प्रश्नावल्या एकत्र करून आलेल्या प्रत्येक प्रतिसादाचे अर्थनिर्वचन केले.

**निष्कर्ष** : विधार्थ्यानी दिलेल्या प्रतिसादावरून खालील निष्कर्ष काढले.

१. घरामध्ये जी भाषा बोलली जाते त्या भाषेचा विधार्थ्याच्या बोलण्यावरती प्रभाव असतो. त्यामुळे त्यांना इतर भाषा वेगळया वाटतात.
२. शाळेमध्ये वापरात येणारी प्रमाणित भाषा व त्याचे आकलन हया विधार्थ्याना समजण्यास अवघड जाते.
३. ठाकरी भाषा आणि प्रमाणीत मराठी यांच्यामध्ये फरक असल्याने या विधार्थ्याच्या मनात गोंधळ निर्माण होतो.
४. मुलभूत संकल्पनांचे आकलन न झाल्याने हे विधार्थी अभ्यासात मागे रहातात. त्यांच्या मनामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झालेली आहे.
५. वर्गातील इतर विधार्थ्यांशी बोलताना त्यांच्या मनात भिती असते , भाषेवरून आपणास कोणी चिडवणार तर नाही ही भावना असते.

६. प्रत्येक वेळी शिक्षक सर्व विधार्थ्यांचे प्रश्न सोडवू शकत नाही अशा वेळी विधार्थ्यांमध्ये एकटेपणाची भावना निर्माण होते.

७. घरातील व परिसरातील भाषा आणि शाळेतील भाषा पूर्णपणे वेगळी असल्याने समायोजन साधताना अडचणी येतात.

**शिफारशी :**

**१.** प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया आहे. तेव्हा प्राथमिक शिक्षण विधार्थ्याला मातृभाषेतून दिले जावे.

**२.** आदिवासींच्या बोलीभाषेमध्ये भाषेची पुस्तके असावीत.

**३.** प्रत्येक शाळेमध्ये एक तरी शिक्षक त्यांची बोलीभाषा येणारा असावा.

## संदर्भसूची

*वाल्हेकर ज्ञानेश्वर (नोव्हेंबर २०१२),**आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास**, औरंगाबाद:स्वरूप प्रकाशन.*

*वाघमारे अमोल,(२०१५),**मावळी बोली व महादेव कोळी समाज** , पुणे प्रफुल्लता प्रकाशन*

*गारे गोविंद (२००५), **आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे ,** प्रणे सुगावा प्रकाशन.*

*मुळे रा.श व उमाठे वि.तु (१९७७) , **शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे** , म.वि.ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर .*